Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 01/11/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटण्या, आपल्या वाटण्या...

आपलं महानगर my महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## विनोदी अभिनेते शरद तळवलकर



शरद तळवलकर हे मराठी चित्रपटांतील अभिनेते होते. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९१८ रोजी झाला. शालेय जीवनात म्हणजे पुण्याच्या भावे स्कूलमध्ये ऐनवेळेस 'रणदुंदुंभी' नाटकातील शिशुपाल आणि 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील भद्रायु भाटकर ही पात्र त्यांनी अतिशय सुंदर रीतीने रंगविली होती. इथूनच त्यांच्या रंगभूमीच्या प्रवासाला सुरुवात झाली. कित्येकदा लहान-मोठी किंवा अगदी पडदा उघडताना ऐनवेळी अशा भूमिका रंगवून त्यांनी आपले नाव नाट्यवर्तुळात सर्वतोमुखी केले. पुढे केशवराव दात्यांच्या 'नाट्यविकास' मंडळीत त्यांनी नोकरी केली. 'छापील संसार' नावाच्या पहिल्या व्यावसायिक नाटकात त्यांनी काम केले. हा अभिनयाचा छंद जोपासत असताना त्यांनी 'मिलिटरी अकाउंट्स' मध्ये नोकरी केली.

विनोदी अभिनेता म्हणून त्यांनी केलेला पहिला चित्रपट होता 'माझा मुलगा' तिथून सुरू झालेला विनोदी अभिनेत्याचा प्रवास शेवटपर्यंत सुरूच होता. नाट्य आणि चित्रपट दोन्ही क्षेत्रांत त्यांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली होती. बालगंधर्वांसारख्या नटश्रेष्ठाबरोबर 'एकच प्याला'तील रंगवलेली तळीरामाची भूमिका बालगंधर्वांच्या शाबासकीला पात्र ठरली. 'लग्नाची बेडी' या नाटकातला गोकर्ण शरद तळवलकरांनी आपल्या ठसकेबाज शैलीत रंगवून अविस्मरणीय केला. पुणे आकाशवाणी केंद्रावर नाट्यनिर्माते म्हणून केलेले त्यांचे कार्य मोलाचे होते. त्यांच्या काळातील नभोनाट्ये हा श्रोत्यांच्या आवडीचा विषय होता. 'कलाकार' ही नाट्यसंस्था त्यांनी उभारली. 'मुंबईचा जावई' या चित्रपटात त्यांनी केलेली भूमिका वास्तवाशी निगडित असून खूपच सुंदर होती. अतिशय बोलक्या चेहऱ्याच्या या विनोदी कलावंताला नाट्यसृष्टीत मानाचा समजला जाणारा 'विष्णूदास भावे' पुरस्काराने गौरविले गेले. अशा या विनोदी अभिनेत्याचे २१ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Nov 01, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's SND POLYTECHNIC KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

| | |
|---|---|
| LIBRARIAN<br>MR.U.D. MULANI<br>SND POLYTECHNIC<br>YEOLA-423401 | PRINCIPAL<br>PROF.U.B JADHAV<br>SND POLYTECHNIC<br>YEOLA-423401 |